**राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र**

क्रमांक-रानिआ/रापनो-२०१७/लोकशाही पंधरवडा/प्र.क्र.१४/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १२ जून, २०१९.

प्रति,
मा.विभागीय आयुक्त (सर्व)
मा. जिल्हाधिकारी (सर्व)
मा. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय:- दिनांक २६ जानेवारी, २०१९ ते दिनांक १० फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत “लोकशाही पंधरवडा” साजरा करण्यासंदर्भात...

संदर्भ:- १. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ चे आदेश
२. आयोगाची समक्रमांकाची दिनांक २९/११/२०१८ व ४/१२/२०१८ ची निर्देश पत्रे

महोदय/महोदया,

आपल्याला माहितच आहे की, लोकशाही सुदृढ व्हावी यादृष्टीने समाजातील सर्व लोकांना सतत शिक्षणाद्वारे जागरुक करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने संदर्भ क्र. १ येथील आदेश दिनांक ६ जानेवारी, २०१८ अन्वये राज्यस्तरापासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत “लोकशाही पंधरवडा” साजरा करण्याचे ठरविले आहे.

२. राज्यातील पहिला “लोकशाही पंधरवडा” २०१८ साली दिनांक २६/१/२०१८ ते १०/२/२०१८ या कालावधीत, अत्यंत कमी कालावधी असतानाही आपल्या पुढाकाराने यशस्वीरित्या पार पाडण्यात आला.

३. २०१९ साली आणखी मोठ्या प्रमाणावर हा पंधरवडा साजरा करण्यात यावा यादृष्टीने संदर्भ क्र. २ नुसार ३ ते ४ महिने अगोदर निर्देश देण्यात आले. या पंधरवड्याच्या आयोजनाकरिता योग्य असा

वेळ मिळाल्यामुळे हा पंधरवडा अत्यंत भव्य प्रमाणात साजरा होऊ शकला. यावेळी अनेक नवीन उपक्रम आपल्या सहकार्याने राबविण्यात आले.

४. सन २०२० साली हा पंधरवडा योग्य रितीने राबविण्यात यावा याकरिता आतापासून कार्यक्रमाचे नियोजन करणे योग्य राहील. मात्र, हे करताना खालील बाबींकडे लक्ष ठेवणे आवश्यक राहील :-

(i) सप्टेंबर-ऑक्टोबर-२०१९ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका

(ii) २०२० मध्ये मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका (सुमारे १५,०००)

५. "लोकशाही पंधरवड्या" चा वापर २०२० मध्ये होणाऱ्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकांकरिता चांगल्या पध्दतीने होऊ शकतो. म्हणून वरील बाबी लक्षात घेता २०२० साली साजरा होणाऱ्या "लोकशाही पंधरवड्या" साठी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

(१) प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्दीच्या टप्प्यांवरच मतदार यादीसाठी विधानसभेचा ग्राह्य धरण्यात येणारा दिनांक आयोगाकडून घोषित करण्यात येत असल्याने नव्या मतदारांना मतदार यादीत नोंदणीसाठी पूर्वसूचना मिळते. याद्दष्टीने सर्वंकष मतदार नोंदणी अभियान व्यापक स्वरुपात राबविणे.

(२) लोकांचा सक्रीय सहभाग वाढेल असे उपक्रम राबविणे.

(३) या व्यतिरिक्त आपणाकडून मागील दोन वर्षात राबविण्यात आलेल्या नावीन्यपूर्ण कल्पना

(४) महानगरांजवळ वसलेल्या आकाराने मोठ्या असलेल्या ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणी व मतदानासंदर्भात जागृतीसाठी विशेष प्रयत्न करणे .

(५) आरक्षित जागांवर उमेदवारी अर्ज भरण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तिंसाठी जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यासाठी विशेष मेळाव्यांचे आयोजन करणे .

(६) आपल्या कार्यक्षेत्रातील स्वयंसेवी संस्था उदा" Lions Club, Rotary Club" यांच्या सहकार्याने मतदार जागृती मोहीम राबविणे .

(७) राज्य निवडणूक आयोग हे शासनापेक्षा स्वतंत्र असल्याचे व त्याबाबतची सविस्तर माहिती वृत्तपत्र व साप्ताहिकामध्ये प्रसिध्द करणे.

(८) व्यापारी उद्योगपती यांची बैठक घेऊन मतदार यादी जागृती अभियानाची व्यापक , प्रसिध्दी करण्यासाठी त्यांचे सहकार्य उपलब्ध करुन घ्यावे.

(९) मतदान केंद्रातील सर्व सोयी सुविधांची तपासणी करणे व यासाठी निधी आवश्यक- असल्यास संबंधीत यंत्रणेकडे पत्राद्वारे तातडीने पाठपुरावा करणे.

(१०) लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे काळजी घेणे तसेच निवडणुकांबाबत , उपाययोजना या विषयावर चर्चासत्र घेणे.

(११) मतदार यादीत महिला मतदारांची टक्केवारी कमी आहे अशा मतदार केंद्रांचा शोध घेऊन त्याठिकाणी महिला मतदारांचे नाव नोंदणीकरीता विशेष मोहिम राबविण्यात यावी, इत्यादी.

वरील मुद्यांसंदर्भात आपल्या मार्गदर्शनार्थ प्रसिध्दी साहित्याचे आयोगाकडे उपलब्ध असलेले उत्कृष्ट नमुने आपणास लवकरच ई.मेलद्वारे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील-

**जनाबाबत पर्याप्त कालावधी उपलब्ध असल्यानेसदर कार्यक्रमाच्या नियो या कार्यक्रमाचे परिपूर्ण नियोजन करण्यात यावे. यादृष्टीने तालुका व जिल्हा स्तरावर प्रारुप कृती आराखडा तयार करून तो विभागीय आयुक्तांमार्फत तसेच महानगरपालिकांच्या बाबतीत मनपा आयुक्त यांनी राज्य निवडणूक आयोगास परस्पर दि. ३१ जुलै २०१९ पर्यंत सादर करण्यात यावा .तसेच या अहवालासोबत उक्त विषयी विभागीय व जिल्हा पातळीवर कार्यक्षम नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याबाबतचा तपशील (नोडल अधिकाऱ्याचे नाव, संपर्क क्रमांक,ई-मेल आयडी, पद, कार्यक्षेत्र, इ.)**

**यासंदर्भात आपणाकडून येत असलेल्या कामगिरीचा आढावा ऑगस्ट-२०१९ मध्ये मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित केलेल्या बैठकीत घेण्यात येईल.**

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार .

आपला,

( राजाराम झेंडे )
सह सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत माहिती व उचित कार्यवाहीसाठी -:
सचिव (सर्व विभाग)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
सर्व विद्यापीठे
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
निवड नस्ती.